**ठळक बातम्या**

- भारतीय अर्थव्यवस्थेचा पाया मजबूत असून अमेरिकी डॉलर वगळता इतर चलनांच्या तुलनेत रुपया घसरत नसल्याचं केंद्रीय अर्थमंत्र्यांकडून स्पष्ट
- गेल्या महिन्यात वस्तू आणि सेवा कर संकलन एक लाख ९५ हजार कोटी रुपयावर
- आदिवासीबहुल भागांमधलं सर्व प्रकारचं मागासलेपण दूर करण्यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचं प्रतिपादन
- महिला क्रिकेटमध्ये, 19 वर्षांखालच्या टी ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेत दक्षिण आफ्रिकेवर ९ गडी राखून मात करत भारतानं पटकावलं विजेतपद

**आणि**

- भारत आणि इंग्लंड यांच्यातल्या टी-२० क्रिकेट मालिकेतला पाचवा सामना मुंबईत सुरु / अभिषेक शर्मानं झळकावलं ३७ चेंडूत शतक

**<><><><><>**

भारतीय अर्थव्यवस्थेचा पाया मजबूत असून अमेरिकी डॉलर वगळता इतर परदेशी चलनांच्या तुलनेत भारतीय रुपयाची घसरण होत नाही, असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी स्पष्ट केलं आहे. २०२५-२६ या वर्षाचा

अर्थसंकल्प काल संसदेत सादर झाल्याच्या पार्श्वभूमीवर वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत त्या बोलत होत्या.

देशातल्या प्रामाणिक करदात्यांमुळे अर्थव्यवस्थेला मोलाचं योगदान मिळत असून यंदाचा अर्थसंकल्प तयार करताना त्यांच्याकरता करांमधे सवलत द्यायचं उद्दिष्ट होतं, असं त्या म्हणाल्या. करआकारणी सुलभ आणि सोपी असावी, त्यामुळे करभरणा प्रामाणिकपणे करण्याला प्रोत्साहन मिळतं, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

जानेवारी २०२५ या महिन्यात एक लाख ९५ हजार कोटी रुपये वस्तू आणि सेवा कर महसूल जमा झाला आहे. जानेवारी २०२४ च्या तुलनेत या महिन्यात कर महसूलात १२ पूर्णांक ३ दशांश टक्के वाढ झाली आहे. या महिन्यात केंद्राचं वस्तू आणि सेवा कर संकलन ३६ हजार ७७ कोटी रुपये आणि राज्याचं वस्तू आणि सेवा कर संकलन ४४ हजार ९४२ कोटी रुपये इतकं आहे. एकात्मिक वस्तू आणि सेवा कर संकलन १ लाख कोटी रुपये तर उपकर संकलन १३ हजार ४१२ इतकं आहे.

**<><><><><>**

आदिवासीबहुल भागांमधलं सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक मागसलेपण दूर करणं सर्वांत मोठं आव्हान असून सरकार त्यादृष्टीने सातत्याने प्रयत्न करत आहे, असं प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी  यांनी केलं. नागपूर

मध्ये एम्स इथं महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ आणि अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेच्या वतीनं आयोजित फिस्ट २०२५ या परिषदेच्या उद्घाटनावेळी गडकरी आज बोलत होते. सेवा आणि उत्पादन क्षेत्राचं जीडीपीमधलं योगदान वाढवण्यासाठी सरकारनं दुर्गम भागांना प्राधान्य दिलं आहे, आदिवासीबहुल भागाच्या सर्वसमावेशक विकासासाठी रोजगाराच्या संधी निर्माण कराव्या लागतील, त्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज असल्याचं गडकरी म्हणाले.

या परिषदेचा समारोप मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या उपस्थितीत झाला. आदिवासींच्या आरोग्याच्या समस्या दूर करणं केवळ भारतच नाही तर जगाच्या दृष्टीनं महत्वाचं आहे, असं ते यावेळी म्हणाले. आदिवासींची पारंपरिक उपचार पद्धती आणि आधुनिक वैद्यकीय कौशल्याचा संगम करूनच आदिवासींपर्यंत आरोग्य सेवा निटपणे पोहोचवता येतील असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

देशभरात आज वसंत पंचमी साजरी होत आहे. या दिवशी विद्येची देवता सरस्वती देवीची पूजा केली जाते, तसंच वसंत ऋतूचं स्वागत करून निसर्गातील नवनिर्मितीचा उत्सव साजरा केला जातो.

शिक्षण आणि ज्ञानाचं महत्व सांगणारा तसंच समृद्धी आणि आनंदाचा उत्सव साजरा करणारा हा दिवस असून सर्व देशवासियांना शुभेच्छा देत असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी समाजमाध्यमावर लिहिलं आहे. लवकरच भारत

जागतिक स्तरावर ज्ञानाचं केंद्र म्हणून उदयाला येवो अशी सदिच्छा त्यांनी व्यक्त केली आहे.

प्रधानमंत्री मोदी यांनीही समाजमाध्यमावर देशवासियांना वसंतपंचमीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

**पंढरपुरा**त आज वसंत पंचमीच्या मुहूर्तावर विठ्ठल-रुक्मिणीचा विवाह सोहळा साजरा झाला.

**श्रीलंके**त कोलंबो इथं आज वसंत पंचमीनिमित्त सरस्वती पूजेचं आयोजन करण्यात आलं होत. स्वामी विवेकानंद सांस्कृतिक केंद्र आणि भारतीय सांस्कृतिक संस्थेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात तिथले भारतीय उत्साहानं सहभागी झाले होते.

**<><><><><>**

सांस्कृतिक मंत्रालयानं आकाशवाणीच्या सहकार्यानं आज नवी दिल्लीत आकाशवाणी भवन इथं 'हर कंठ में भारत' हा विशेष शास्त्रीय संगीत कार्यक्रम सुरू केला. हा कार्यक्रम आजपासून १६ फेब्रुवारीपर्यंत दररोज २१ आकाशवाणी केंद्रांवरून सकाळी साडेनऊ ते १० वाजेपर्यंत थेट प्रसारित केला जाईल. या कार्यक्रमात शास्त्रीय संगीतावर आधारित कार्यक्रम होणार आहेत. सांस्कृतिक मंत्रालयाचे सचिव अरुणिश चावला आणि प्रसार भारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी यांनी या कार्यक्रमाचं उद्घाटन केलं.

आकाशवाणीच्या महासंचालक डॉ. प्रज्ञा पालीवाल गौर यावेळी उपस्थित होत्या.

‘हर कंठ में भारत’ हा उपक्रम युवा कलाकारांना त्यांची प्रतिभा राष्ट्रासमोर सादर करण्यासाठी एक व्यासपीठ प्रदान करेल, असं अरुणिश चावला यांनी आकाशवाणीशी विशेष संवाद साधताना सांगितलं. सांस्कृतिक मंत्रालयाचा हा एक अनोखा उपक्रम असून त्यामुळे केवळ कलाकारांनाच नव्हे, तर आकाशवाणीलाही श्रोतृवर्ग वाढवण्यासाठी सहाय्यभूत ठरेल, असं आकाशवाणीच्या महासंचालक डॉ. प्रज्ञा पालीवाल गौर यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

आम आदमी पार्टी दर तासाला नवीन धोरण जाहीर करत असते, हे त्यांना नैराश्य आल्याचं  द्योतक आहे, अशी टीका ज्येष्ठ भाजपा नेते आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केली. दिल्ली विधानसभेच्या प्रचारसभेत ते आज आर के पुरम इथे बोलत होते. आम आदमी पार्टीनं दिल्लीचा काहीही विकास केला नाही आणि ११ वर्ष वाया घालवली, असा आरोप त्यांनी केला.

**<><><><><>**

महिला क्रिकेटमध्ये 19 वर्षांखालच्या टी ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेत, अंतिम सामन्यात भारतानं दक्षिण आफ्रिकेवर ९ गडी राखून दणदणीत विजय मिळवत, विश्वचषकावर आपलं नाव कोरलं.

प्रथम फलंदाजी करताना दक्षिण आफ्रिकेचा संघ अवघ्या ८२ धावात गारद झाला. भारताच्या गोंगदी त्रिशानं सर्वाधिक तीन गडी बाद केले. तर पारुनिका सिसोदिया,आयुषी शुक्ला आणि वैष्णवी शर्मा यांनी प्रत्येकी दोन आणि शबनम शकिल हिनं एक गडी बाद केला. विजयासाठी ८३ धावांचं लक्ष्या भारतानं एका गड्याच्या बदल्यात बाराव्या षटकातच पार केलं. गोंगदी त्रिशानं नाबाद ४४, तर सानिका चाळकेनं नाबाद २६ धावांची खेळी करत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केलं. गोंगदी त्रिशा या सामन्यातली, तसंच स्पर्धेतली सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरली.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भारताच्या विश्वचषक विजेत्या संघाचं अभिनंदन केलं आहे. हा विजय अनेक उदयोन्मुख खेळाडूंना प्रेरणा देणारा आहे. भारताच्या या नारीशक्तीचा आपल्याला अभिमान वाटतो, असं त्यांनी समाजमाध्यमावर म्हटलं आहे.

**<><><><><>**

भारत आणि इंग्लंड यांच्यातल्या टी-२० क्रिकेट मालिकेतला पाचवा आणि शेवटचा सामना आज मुंबईत वानखेडे सेटेडिअमवर होत आहे. इंग्लंडनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

भारताचा सलामीचा फलंदाज संजू सॅम्सन फटकेबाजी करताना १६ धावांवर बाद झाला. मात्र अभिषेक शर्मानं ३७ चेंडूत शतक ठोकलं. शेवटची बातमी

हाती आली तेव्हा भारताच्या १४व्या षटकात ४ बाद १८२ धावा झाल्या होत्या.

या मालिकेत भारतानं ३-१ अशी विजयी आघाडी घेतली आहे. या टी-२० मालिकेनंतर दोन्ही संघांमध्ये तीन एकदिवसीय सामने होणार आहेत.

**<><><><><>**

देहरादून इथं सुरू असलेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत मध्य प्रदेशाच्या आशी चौकसे हिनं महिलांच्या ५० मीटर रायफल थ्री पोझिशन नेमबाजी प्रकारात सुवर्ण पदक जिंकून राष्ट्रीय विक्रम मोडित काढला.

आशीने २०२३च्या हांगझोऊ आशियाई क्रीडा स्पर्धेत ५० मीटर रायफल थ्री पोझिशन्स प्रकारात रौप्य पदक पटकावलं होतं.

दरम्यान, या क्रीडा स्पर्धेत संरक्षण सेवा दलं पहिल्या स्थानावर, कर्नाटक दुसऱ्या स्थानावर असून महाराष्ट्र तिसऱ्या स्थानावर आहे.

**<><><><><>**

नवी दिल्लीत डी एल टी ए स्टेडियमवर सुरु असलेल्या डेवीस कप टेनिस स्पर्धेत भारताने टोगो च्या संघाचा ४- शून्य असा पराभव केला आहे. डेव्हिस चषक स्पर्धेत प्रथमच खेळत असलेल्या भारताच्या करण सिंग ने टोगो च्या होडबलो इसाक पाडिओ चा टायब्रेकर मध्ये पराभव केला. एन श्रीराम बालाजी आणि रित्विक बोल्लीपल्ली यांनीही दुहेरी सामन्यात आपल्या प्रतिस्पर्धी संघाला हरवल आहे.

**<><><><><>**

केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांनी आज नवी दिल्लीत भारतीय नौदलाच्या अर्ध मॅरेथॉनला हिरवा झेंडा दाखवून स्पर्धेचं उदघाटन केलं. यावेळी तिन्ही संरक्षण दलांचे प्रमुख आणि इतर अधिकारी उपस्थित होते. जवाहरलाल नेहरू स्टेडियममधून सुरु झालेल्या या स्पर्धेत सुमारे १० हजार स्पर्धक सहभागी झाले होते.

**//<><><><><>//**